# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ३०.०७.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २९.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण १३,०६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केस मध्ये ११ इसमांवर कारवाई करुन ६७,६६५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आ आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२९५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४८,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २९.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३०.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०४ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २९.०७.२०२६ चे १४.४० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट क्र. १५, कळमणा वस्ती, सरस्वती नगर येथे राहणारी महीला संगिता दौलतराव सोनुले वय ४९ वर्षे हिचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, आरोपी महिला ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करवुन पिडीत महीलेकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०००/—रू., ०१ जुना मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे ३,०१०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कळमणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक २९.०७.२०२६ चे २१.०५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत पाहिजे आरोपी व गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अभ्यंकर नगर चौक ते एलएडी चौककडे जाणाऱ्या मार्गावर विरुध्द दिशेने एक इसम काळया रंगाचे दुचाकीवर संशयीररित्या दिसल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सागर गौतम झारीया वय २६ वर्षे रा. दंतेश्वरी झोपडपट्टी, ऑरेंज सिटी हॉस्पिटलमागे, बजाजनगर, नागपूर असे सांगितले. त्याची व त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच ३१ डीआर ४५३३ ची झडती घेतली असता, गाडीचे सिटखाली एक छोटी लोखंडी तलवार मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन तलवार व वाहन असा एकूण ३५,५००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. सहकलम ४,२५ भा.ह.का अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि प्रशांत ठवरे, सपोनि विनोद देशमुख, पोहवा प्रितम यादव, योगेश वासनिक व अजमत शेख यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे हिंगणा :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी श्रीमती शोभा किशोर जुनघरे वय ३८ वर्षे, रा. मांडवघोराड, वार्ड क्र. २, मोहगाव झिल्पी, हिंगणा नागपूर यांचा परिचीत इसम आरोपी नामे आकाश प्रकाश तुराडे वय ३५ वर्ष रा. धनगरपुरा हिंगणा याने त्यांची पाच एकर शेती विकुन दिली होती. मिळालेली रक्कम फिर्यादी व त्यांचे मुलाचे ऍक्सिस बॅक, शाखा हिंगणा येथे नेऊन जमा केली होती. त्यानंतर आरोपीने फिर्यादीस शेत जमीन खरेदी करुन देतो तसेच प्लॉट खरेदी करुन देतो, अशा भुलथापा देऊन फिर्यादीला बॅकेंत नेऊन, फिर्यादी तसेच त्यांचे मुलाचे बॅक खात्यातुन स्वत:चे बॅक खात्यात रक्कम वळती केली तसेच आरोपीने फिर्यादीस रोख रक्कम काढण्यास भाग पाडून ती रक्कम स्वत: घेतली. आरोपीने फिर्यादीचा विश्वासघात करुन त्यांचेकडून एकूण ३२ लाख रुपये घेऊन कोणताही प्लॉट किंवा शेत घेऊन न देता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन आर्थिक फसवणूक केली.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. शेडमाके ९८५००८१३७५ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २८.०७.२०२६ चे १९.०० वा. ते २०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. ७१, संतोषीमाता नगर, गंगोत्री लॉन समोर राहणारे राहणारे फिर्यादी भुषण नरेंद्र इंगोले वय ३२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन पत्नीसह मुलाचे कोचींग क्लासमध्ये कोराडी येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १३,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,१६,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. बाबर ९०९६६७६९३६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अंबाझरी</u> :–** खुशी उर्फ नंदु नरेश पाली वय ३८ वर्षे रा. सुरेंद्रगढ, बजरंग चौक, गिट्टीखदान नागपूर हे दिनांक २६.०७.२०२६ रोजी १२.०० वा. पासून पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत गोकुलपेठ येथील कामावरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग–गोरा, चेहरा–लांब, बांधा–मजबुत, उंची–५ फुट, केस–काळे पांढरे, अंगात– पिवळी टि शर्ट ज्यावर अल्ट्राटेक लिहलेले असून हॉफ पॅन्ट घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलतात. ओळखचिन्ह– उजवे हातावर खुशी नाव गोंदलेले आहे.



खुशी उर्फ नंद

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०८०००८ ०/१९९ | कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | १) महेंद्र उर्फ भांजा बापुराव मराठे रा. प्लॉट क्र. २९४, कपीलनगर, जरीपटका नागपुर<br>२) विष्णु यादव उर्फ चैतराम यादव उर्फ सोनवणे रा. डिप्टी सिंग्नल, वर्माचे घराजवळ, कळमणा, नागपूर<br>३) प्रकाश उर्फ संजय उर्फ अजय रामु राघोबा उर्फ श्रीराम बराबे उर्फ जगनाडे रा. नवी शुक्रवारी, फवारा चौक, शाहूचे वाडयात किरायाने, कोतवाली, नागपूर<br>४) अशोक धोंडबाजी चिनकुरे उर्फ बिनकर रा. प्लॉट क्र. १७६, कबीरनगर, जरीपटका, नागपूर<br>५) विठ्ठल शंकरराव गभणे रा० प्लॉट क्र. २७, धनलक्ष्मी सोसायटी, भरतवाडा झोपडपट्टी, कळमणा, नागपूर<br>६) दादाराम श्रीराम चौधरी, रा. नयापुरा प्रेमनगर, झेंडापुरा, नागपूर | २०.०८.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०८०३४ ३/१९९८ | कलम ३२६ भा.दं.वि. | भोलाराम भगतराम शाहू वय ५० रा. सिदधार्थनगर झोपडपट्टी, महादुला कोराडी, नागपूर | २०.०८.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०८०२९ ६/१९८९ | कलम ४०९, ३४ भा.दं.वि. | १) दासन जगन कढोले रा. सुगतनगर, जरीपटका नागपूर<br>२) शकुंतलाबाई रघुविरसिंग वर्मा रा. आंबेडकर रोड, पंजाब नॅशनल बॅकसमोर, बुंध्दनगर कोराडी, नागपूर | २०.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०४२५७ /२००६ | कलम ५०६ ब, ३४ भा.दं.वि. | १) मोहम्मद अकील मोहम्मद इकराम वय २३ रा. हफीज बेकरी मागे,मोमीनपुरा, तहसील नागपूर<br>२) रियाज अहमद मोहम्मद नुमान वय ३८ वर्ष रा. अन्सार नगर, मोमीनपुरा, नागपूर<br>३) राजा खान रशीद खान वय २१ रा. टिचर कॉलनी, मस्जिद जवळ, अवस्थीनगर, गिट्टीखदान, नागपूर. | २०.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**